जनसंपर्क कक्ष
14 OCT 2023 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषीसह शिक्षण क्षेत्रात योगदान

## डॉ. राजन गवस यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शेतकऱ्यांची प्रगती हेच डॉ. पंजाबराव देशमुख यांचे ध्येय होते. त्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यांविषयी तळमळीने कार्य करणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शेती व शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग, गांधी अध्यासन केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्यासन आणि अमरावती येथील श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्रात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या चर्चासत्राचा विषय 'डॉ. पंजाबराव देशमुख : व्यक्ति, विचार आणि कार्य' होता. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

हर्षवर्धन देशमुख म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये देशाचे पहिले कृषी मंत्री, कृषी रत्न, शिक्षण महर्षी, शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर १२५ व्या जयंतीनिमित्त पहिल्या चर्चासत्राचे आयोजन केले आहे.



कोल्हापूर : डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित चर्चासत्रात बोलताना डॉ. राजन गवस. सोबत शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रविंद्र भणगे आदी.

अधिष्ठाता डॉ. महाजन म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त राज्य आणि देश पातळीवर विचारांची मैफल सुरू आहे. त्यामध्ये पहिले चर्चासत्र शिवाजी विद्यापीठामध्ये आयोजित केले, याचा आनंद आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांची प्रेरणा घेण्याची गरज आहे.

डॉ. रविंद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी परिचय करून दिला. डॉ. नेहा वाडेकर यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले. यावेळी, अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप हंगोले, कार्यकारीणी सदस्य हेमंत काळमेघे, उपस्थित होते.


तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात पाच दिवसीय ग्यान कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर यांच्या सहकार्यातून शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागाच्या वतीने सोमवार १६ ते २० या कालावधीमध्य ग्यान कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सोमवारी सकाळी ठीक १० वाजता राजर्षी शाहू सभागृहामध्ये माजी कुलगुरू डॉ. एम. एम. साळुंखे यांच्या हस्ते उद्घाटन होणार. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के आहेत. अमेरिकेतील प्रा. डॉ. पी. व्ही. कामत व प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील प्रमुख पाहुणे आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे प्रा. सतीश पाटील, पुणे विद्यापीठाचे प्रा. संतोष हराम, प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत देशभरातून शंभरहून अधिक संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. कार्यशाळेचा समारोप शुक्रवार २० रोजी आहे, अशी माहिती प्रभारी विभागप्रमुख प्रा. डॉ. के. डी. सोनवणे व ग्यान समन्वयक प्रा. डॉ. डेळेकर यांनी दिली.

सकाळ

# विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जपली पाहिजे : कुलसचिव डॉ. शिंदे



कोल्हापूर : 'भाषेच्या विद्यार्थ्यांनी वाचा, वेचा, साठवा आणि उपयोगात आणा या चतुःसूत्रीतून वाचन संस्कृती जपली पाहिजे', असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाने 'भारतीय भाषा उत्सव' कार्यक्रमाअंतर्गत हिंदी, संस्कृत, मराठी, बुंदेलखंडी, अवधी, मैथिली, मारवाडी, उर्दू भाषांचा परिचय देणारे 'पोस्टर प्रदर्शन' भरवले होते. त्याच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रदर्शनाचे उदघाटन भारतीय जीवन बीमा निगमच्या कोल्हापूर शाखेचे कार्मिकओ औद्योगिक संबंध विभागाचे मुख्य प्रबंधक राजेंद्र पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रभंजन माने प्रमुख उपस्थित होते. प्रा. चंदा सोनकर यांनी प्रास्ताविक केले. विजय सदामते यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. अमृता कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित पोस्टर्स प्रदर्शन उद्‌घाटनप्रसंगी राजेंद्र पाटेकर, डॉ. विलास शिंदे, प्रा. डॉ. विजय सदामते, डॉ. चंदा सोनकर आदी.

# भारतीय भाषा राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक

- **राजेंद्र पाटेकर; विद्यापीठात भारतीय भाषा उत्सव**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतातील विविध भाषा राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असून एलआयसीमधून भाषेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन भारतीय जीवन विमा प्राधिकरणचे कार्मिक व औद्योगिक संबंध, राजभाषा विभागाचे प्रबंधक राजेंद्र पाटेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्या वतीने यूजीसीच्या निर्देशानुसार आयोजित भारतीय भाषा उत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. डॉ. प्रभंजन माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शिंदे यांनी 'वाचा, वेचा, साठवा आणि उपयोगात आणा' ही चतु:सूत्री वापरून वाचन संस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन केले. हिंदी विभागाच्या विद्यार्थ्यांनी भरवलेल्या पोस्टर प्रदर्शनाचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. चंदा सोनकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. डॉ विजय सदामते, डॉ. प्रकाश मुंज, अमृता कांबळे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात बेडकिहाळ यांचे मंगळवारी व्याख्यान

कोल्हापूर : 'महात्मा गांधींचा सामाजिक दृष्टिकोन' या विषयावर शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने मंगळवार, दि. १७ रोजी सकाळी साडेदहा वाजता किशोर बेडकिहाळ यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. प्रा. डॉ. एस. एस. महाजन हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

# युवा महोत्सवात 'विवेकानंद'ची बाजी

## सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप जिंकली : विविध स्पर्धांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या आणि दहीवडी महाविद्यालय, दहीवडी यांच्या संयुक्त विद्यमाने दहीवडी (जि. सातारा) येथे आयोजित केलेल्या ४३ व्या युवा महोत्सवामध्ये प्रथम कुलगुरू दिवंगत डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने मिळविला. तर अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने पटकाविला.

विविध कला प्रकारांतील विजेत्यांची शुक्रवारी घोषणा करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ आयोजित युवा महोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. एकापेक्षा एक बहारदार सादरीकरण झाले. विविध स्पर्धांमधील विजेते पुढीलप्रमाणे : सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक - दहीवडी कॉलेज दहीवडी, सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक - किसनवीर महाविद्यालय, वाई. विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरता गौरव चषक नृत्य विभागात दहीवडी कॉलेज, किसनवीर, विवेकानंद महाविद्यालय यांना विभागून देण्यात आला; तर नाट्य आणि संगीत विभागात विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, कला विभागात देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर तर वाङ्मय विभागात गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कऱ्हाडने फिरता गौरव चषक मिळविला.

### वेगवेगळ्या कला प्रकारातील निकाल असा

■ **शास्त्रीय नृत्य :** विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (प्रथम), कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोल्हापूर (द्वितीय), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (तृतीय) नकला - गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली (प्रथम), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (द्वितीय), विलिंग्डन कॉलेज, सांगली (तृतीय) ■ **एकपात्री अभिनय :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली (प्रथम), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (द्वितीय), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (तृतीय) ■ **सुगम गायन :** आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, पलूस (प्रथम) लालबहादूर शास्त्री आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज सातारा (द्वितीय), गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कऱ्हाड (तृतीय) ■ **शास्त्रीय गायन :** मुधोजी कॉलेज फलटण (प्रथम) दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी (द्वितीय), राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी साखराळे (तृतीय) ■ **पाश्चिमात्य एकल गायन :** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा (द्वितीय) देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर (तृतीय) ■ **शास्त्रीय सुरुवाद्य :** मुधोजी कॉलेज फलटण (प्रथम ), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (द्वितीय), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (तृतीय), ■ **शास्त्रीय तालवाद्य :** सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (प्रथम), मुधोजी कॉलेज, फलटण (द्वितीय), महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (तृतीय) ■ **पाश्चिमात्य एकलवादन :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली (प्रथम), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), सायबर कॉलेज, कोल्हापूर (तृतीय) ■ **स्थळचित्र :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (प्रथम), विश्वासराव नाईक कला, वाणिज्य व बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय शिराळा (द्वितीय) के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर (तृतीय) ■ **व्यंगचित्र :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (प्रथम), मुधोजी कॉलेज फलटण (द्वितीय), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (तृतीय).

# 'विवेकानंद'ला सर्वसाधारण विजेतेपद

## दहिवडी येथे विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

दहिवडी, ता. १३ : तरुणाईच्या जल्लोषात शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप झाला. कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील १०० पेक्षा जास्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सलग दोन दिवस तब्बल ३४ कलाप्रकारांचे सादरीकरण केले.



दहिवडी : येथे झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद पटकाविणारा कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाचा संघ.

विजेत्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, प्रभाकर देशमुख यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. अंतिम निकाल असा : सांघिक स्पर्धा प्रकार - अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा सर्वसाधारण विजेतेपद - विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, कुलगुरू स्वर्गीय डॉ. अप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा सर्वसाधारण विजेतेपद मुधोजी महाविद्यालय, फलटण. सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक- दहिवडी महाविद्यालय, सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक- किसन वीर महाविद्यालय, वाई.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरते गौरव चषक : नृत्य विभाग विभागून- दहिवडी महाविद्यालय, किसन वीर महाविद्यालय, वाई व विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर. नाट्य विभाग- विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर. संगीत विभाग- विवेकानंद विद्यालय, कोल्हापूर. कला विभाग- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर. वाङ्मय विभाग- शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कऱ्हाड.